

# परफेक्शनिस्टच्या नजरेतून

**अभिनेता आमीर खान म्हणजे परफेक्शनिस्ट. आमीर वर्षातून एखादा चित्रपट करतो. पण हा चित्रपट इतका दमदार असतो की त्याची तुलना कशाशीही होऊशकत नाही. आमीर आता 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'मधून रसिकांसमोर येत आहे. याबद्दल तो व्यक्त होतोय.**

प्रेक्षक आमीर खानच्या चित्रपटांची आतुरतेने वाट बघत असतात. चोखाळलेल्या वाटेवर चालण्यापेक्षा तो काही तरी वेगळं करण्याचा प्रयत्न करतो. त्याचे 'दंगल', 'पीके', 'थ्री इडियट्स', 'धूम ३' हे चित्रपट भाव खाऊन गेले होते. १००, २००, ३०० कोटी रूपयांच्या क्लबची सुरूवात आमीर खानच्या चित्रपटांमुळे झाली. हाच आमीर आता 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा चित्रपटातून रूपेरी पडद्यावर येत आहे. त्याचा फिरंगी अवतार प्रेक्षकांना भावला आहे. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'मध्ये काम करताना आलेले अनुभव तो शेअर करतो. आमीर म्हणतो, 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' हा पूर्णपणे वेगळा चित्रपट आहे. यात जबरदस्त ॲक्शन पाहता येणार आहे. या चित्रपटातून कोणताही संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला नाही. चित्रपटात मी फिरंगी ही व्यक्तिरेखा करतो आहे. माझी व्यक्तिरेखा विश्वासास अजिबात पात्र नाही. फिरंगीवर कोणीही विश्वास ठेऊशकत नाही. पैशांसाठी फिरंगी काहीही करू शकतो. माझी व्यक्तिरेखा प्रेक्षकांचं मनोरंजन करेल यात शंका नाही. अत्यंत हरहुन्नरी, मजा-मस्ती करणारं असं फिरंगीचं व्यक्तिमत्त्व आहे. ही भूमिका साकरताना मला खूपच मजा आली. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' प्रेक्षकांचं मनोरंजन करणार आहे. या चित्रपटामधून मी कोणताही सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न मी केलेला नाही. त्यामुळे प्रेक्षकांनी यावं आणि चित्रपटाचा मनमुराद आनंद लुटावा.

या चित्रपटात आमीर खान आणि अमिताभ बच्चन पहिल्यांदाच एकत्र येत आहेत. अमिताभ यांच्यासोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल आमीर म्हणतो की, अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करणं हे माझं स्वप्नं होतं. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'च्या निमित्ताने माझं हे स्वप्न पूर्ण झालं आहे. लहान असल्यापासून मी त्यांचे चित्रपट पहात आलो आहे. आज इतक्या वर्षांनंतर माझी इच्छा पूर्ण होत आहे. या क्षेत्रात मला ३० वर्षं झाली आहेत. या काळात अमिताभ यांच्यासोबत एकही चित्रपट करायला न मिळणं हे खूपच वाईट होतं. पण आता मला खूप छान वाटत आहे. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' हा भव्य-दिव्य चित्रपट आहे. बॉलिवूडमध्ये मी आजवर असा अनुभव कधीही घेतला नव्हता. चित्रपटाच्या सेटपासून व्यक्तिरेखांपर्यंत सगळं काही भव्यदिव्य आहे. प्रेक्षकांनाही यामुळे खूप वेगळा अनुभव मिळणार आहे.



# 'ठग्ज...'चा अनुभव आगळा!

**फातिमा सना शेखने अगदी लहान वयात अभिनयाच्या कारकिर्दीला सुरूवात केली. पण 'दंगल'मुळे तिला नवी ओळख मिळाली. 'दंगल गर्ल' म्हणूनच ती ओळखली जाते. फातिमा आता 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'मधून रसिकांसमोर येत आहे. या चित्रपटातले अनुभव ती कथन करते.**

'दंगल'मधल्या गीता फोगटच्या भूमिकेमुळे अभिनेत्री फातिमा सना शेखला नवी ओळख मिळाली. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'च्या रूपात तिला दुसरा मोठा चित्रपट मिळाला. यात आमीर खानसोबत पुन्हा काम करण्याची संधी तिला मिळाली आहे. तसंच बिग बी अमिताभ बच्चन यांच्यासोबतही तिला काम करायला मिळालं आहे. यामुळे ती खूपच उत्साही आहे. या दोघांसोबत काम करण्याचा अनुभव आणि एकंदरित 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'सारखा भव्य-दिव्य चित्रपट करताना आलेले अनुभव ती शेअर करते. फातिमा म्हणते, 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'चा अनुभव जबरदस्त होता. हे सगळं माझ्यासाठी अगदी स्वप्नवत आहे. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' 'दंगल'पेक्षा पूर्णपणे वेगळा चित्रपट आहे. 'दंगल' हा वास्तववादी चित्रपट होता तर 'ठग्ज...'ला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'चं सगळं अगदी भव्य-दिव्य होतं. सेट्स खूप मोठे होते. लोकांचे पेहरावही खूपच वेगळे होते. हा खूपच वेगळा अनुभव होता. मला नवे अनुभव घेता आले.

फातिमा पुढे म्हणते की 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'चं शूटिंग आम्ही खूप दिवसांपासून करत होतो. या चित्रपटातून मला खूप काही शिकता आलं. मी सातत्याने नवं काही तरी शिकत आहे. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'सारखा चित्रपट करायला मिळणं हे खरंच खूपच भाग्याचं आहे. अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळणं हे प्रत्येक कलाकाराचं स्वप्न असतं. मला ही संधी खूप लवकर मिळाली. कारकिर्दीच्या सुरूवातीलाच आमीर, अमिताभ यांच्यासोबत काम करण्याची संधी लाभली, याबद्दल मी खूप नशीबवान आहे. अमिताभ बच्चन यांच्यासोबत माझे काही सीन्स आहेत. मी त्यांच्या प्रेमातच पडले आहे. ही माणसं आपले आदर्श आहेत. यांची कामं बघतच आम्ही मोठे झाले आहोत. त्यामुळे आपल्या आदर्शांसोबत काम करायला मिळणं ही जन्माची पुण्याई आहे. आम्हा कलाकारांच्या भावना सर्वसामान्यांना कळणार नाहीत. पण हेच खरं आहे. कतरिनानेही मला सांभाळून घेतलं. ती खूपच गोड आहे. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'चा सगळा अनुभव खूप सुंदर होता. प्रेक्षकांनाही हा चित्रपट खूप आवडेल यात शंका नाही.

**'झीरो'हा शाहरूख खानचा बहुप्रतिक्षित चित्रपट. यंदा ख्रिसमसच्या मुहुर्तावर तो प्रदर्शित होत आहे. चित्रपटाचा ट्रेलर नुकताच जारी करण्यात आला. प्रेक्षकांनी हा ट्रेलर पाहून नाकं मुरडली आहेत.**



# 'झीरो'चं काय होणार?

शाहरूख खानच्या 'झीरो'चा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला. पण प्रेक्षकांना आकर्षित करण्यात या ट्रेलरला अपयश आलं आहे असंच म्हणावं लागेल. 'झीरो'मध्ये काय वेगळं आहे, असं विचारत प्रेक्षकांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. 'तनू वेड्स मनू' सिरिज आणि 'रांझणा'सारखे वेगळे चित्रपट देणाऱ्या आनंद एल.रायकडून लोकांना बऱ्याच अपेक्षा होत्या. त्यातच यात शाहरूख बुटक्या मुलाच्या व्यक्तिरेखेत दिसणार आहे. ठेंगणा असल्याने लग्न जमू न शकलेल्या मुलाची भूमिका शाहरूख करत आहे. म्हणूनच चित्रपटात काही तरी वेगळं, हटके अनुभवायला मिळेल, असं प्रेक्षकांना वाटत होतं. पण प्रत्यक्षात हा चित्रपट फुसका बार असल्याचं बऱ्याच प्रेक्षकांचं मत आहे. अर्थात हा ट्रेलर पसंत करणारे प्रेक्षकही आहेत. 'झीरो' बॉक्स ऑफिसवर फार प्रभाव टाकू शकणार नाही, असं काही प्रेक्षकांना वाटत आहे. ट्विटरवर प्रतिक्रियांचा पाऊस पडला आहे. 'झीरो' बॉक्स ऑफिसवर आठवडाभरही टिकाव धरू शकणार नाही, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यात अनुष्का शर्मा आणि कतरिना कैफही आहेत. कॅट यात प्रथितयश अभिनेत्रीची व्यक्तिरेखा साकारत आहे तर अनुष्का अपंग शास्त्रज्ञाच्या भूमिकेत दिसेल. हा चित्रपट म्हणजे मेलोड्रामा असल्याचं प्रेक्षकांचं मत आहे. शाहरूख खानसह या अभिनेत्रींनीही थोडी ओव्हरॲक्टिंग केल्याचंही प्रेक्षकांचं म्हणणं आहे. आनंद एल. रायकडून यापेक्षा चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. पण ती फोल ठरल्याबद्दल प्रेक्षकांनी निराशा व्यक्त केली आहे. त्यामुळे 'झीरो'चं बॉक्स ऑफिसवर काय होणार याची उत्सुकता लागून राहिली आहे.

**बॉलिवूडमधल्या अनेक तारकांमध्ये विस्तवही जात नाही तर काही तारकांची बरीच जवळीक असते. कतरिना कैफ आणि आलिया भट्ट खरं तर चांगल्या मैत्रिणी होत्या. पण रणबीर कपूरमुळे त्यांच्यात दुरावा निर्माण झाला. शाहरूखच्या दिवाळी पार्टीत हा दुरावा अनेकांच्या नजरेत भरला.**




# दुरावा आणि जवळीक

दीपिका कतरिना कैफ आणि रणबीर कपूर रिलेशनशीपमध्ये होते. ब्रेक अपनंतर रणबीरने आलिया भट्टशी सूत जुळवलं. रणबीर आणि आलिया एकत्र फिरत असल्यामुळे कतरिना काहीशी दुखावली होती. आलिया आणि रणबीरचं एकत्र येणं तिला पसंत नव्हतं, असं बोललं जात होतं. पण या दोघींनी एकमेकींमधला वाद चव्हाट्यावर आणला नाही. मैत्रीचं नातं त्यांनी जपलं. पण एकाच छताखाली आल्यावर त्यांच्यातला दुरावा अनेकांच्या नजरेत भरला. कतरिना आणि आलिया शाहरूख खानच्या दिवाळी पार्टीला आल्या होत्या. इथे आली का पंचाईत? एकमेकींमधला बेबनाव लपवताही येईना आणि जवळीकही साधता येईना, अशी या दोघींची स्थिती झाली. अर्थात त्या एकमेकींना भेटल्या. दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. सोबत फोटोही काढले. पण त्यांच्यात सगळं काही आलबेल नाही हे उपस्थितांना जाणवत होतं. त्यांच्या भेटीत एक प्रकारचं ओशाळलेपण होतं. पार्टी सुरू झाल्यावर त्या एकमेकींच्या आसपासही फिरकल्या नाहीत. वेगवेगळ्या ग्रुप्समध्ये वावरताना दिसल्या. या दोघींमध्ये शीतयुद्ध सुरू असल्याच्या चर्चा पार्टीतही रंगल्या होत्या. आलियाच्या आधी कतरिना बाहेर पडली. आलियाला टाळण्यासाठीच ती लवकर गेल्याच्या चर्चाही सुरू होत्या. दरम्यान, रणबीर आणि आलिया पुढच्या वर्षी विवाहबंधनात अडकण्याची शक्यता आहे. ऋषी कपूर आजारातून पूर्णपणे बरे झाल्यानंतर त्यांच्या लग्नाची तारिख ठरण्याची शक्यता आहे. कपूर कुटुंबाची आलियाला पसंती आहे. त्यांनी तिच्यासाठी पायघड्या घातल्या आहेत. रणबीरने आपल्या नात्याची कबुली बरेचदा दिली आहे. पण आलियाने भविष्यातल्या योजनांबद्दल फारसं काही सांगितलेलं नाही. रणबीरशी लग्न झाल्यानंतरही ती अभिनयक्षेत्रातली कारकिर्द सुरूच ठेवणार आहे. दीपिका पदुकोण-रणवीर सिंह, प्रियांका चोप्रा-निक जोनास यांच्यानंतर आता आलिया आणि रणबीर कपूरच्या लग्नाचा बार केव्हा उडणार याकडे चाहत्यांचं लक्ष लागून राहिलं आहे.

**सलमान खानच्या आगामी 'भारत'मधून प्रियांका चोप्रा बाहेर पडली. प्रियांकाने दिलेल्या या धक्क्यातून सलमान अजून सावरलेला नाही. पीसीवर तो अजूनही नाराज आहे. म्हणूनच तिच्या लग्नसोहळ्याला सल्लूभाईच्या उपस्थितीची शक्यता खूपच कमी आहे.**

# सलमान येणार का पीसीच्या लग्नाला?

'भारत' हा सलमान खानचा एक महत्त्वाकांक्षी चित्रपट आहे. या चित्रपटाशी त्याची नाळ जोडलेली आहे. अली अब्बास जफर दिग्दर्शित या चित्रपटात प्रियांका चोप्रा काम करणार होती. तिची निवडही झाली होती. पण निक जोनासशी होणाऱ्या लग्नाचं कारण सांगून ती यातून बाहेर पडली. प्रियांकाच्या अशा अचानक बाहेर पडण्याने सलमान चांगलाच दुखावला गेला. प्रियांकावर चांगलाच रागवला. त्यामुळे प्रियांकाच्या लग्नाला तो उपस्थित राहण्याची शक्यता फारच कमी आहे. प्रियांकाचा लग्नसोहळा २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या काळात जोधपूरमध्ये रंगणार आहे. सर्वांनाच या सोहळ्याची उत्सुकता लागून राहिली आहे. भले भले सेलिब्रिटी भारताबाहेर विवाह करत असताना प्रियांकाने घेतलेला राजेशाही थाटात लग्न करण्याचा निर्णय चर्चेत आहे. सलमानची नाराजी दूर करण्यासाठी प्रियांका जंग जंग पछाडते आहे. मध्यंतरी आयुष शर्माच्या वाढदिवसाला प्रियांका आईसह उपस्थित होती. लग्नाला यायची आठवण करून देण्यासाठीच प्रियांका आईसोबत वाढदिवसाच्या पार्टीला आली होती. प्रियांका




चोप्रा हॉलिवूडमध्ये व्यस्त होती. तिला पुन्हा बॉलिवूडमध्ये यायचं होतं. ही संधी तिला सलमानने दिली. पण तिने सलमानच्याच पाठीत खंजीर खुपसला. 'भारत'मध्ये प्रियांकाच्या जागी कतरिना कैफची वर्णी लागली खरी. पण प्रियांकाचं असं उथळ वागणं सल्लूमियाँच्या चांगलंच जिव्हारी लागलं आहे. 'भारत'मध्ये काम मिळण्यासाठी प्रियांकाने खान कुटुंबियांकडे बरीच आर्जवं केली होती. पण नंतर ती चित्रपटातून बाहेर पडली. त्यामुळे आता सलमान खान प्रियांकाला माफ करणार का आणि झालं गेलं विसरून तिच्या लग्नाला उपस्थित राहणार का, हे पहायला हवं.



## बॉक्स ऑफिस

### 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' धमाक्यासाठी सज्ज!

दिवाळीच्या मुहुर्तावर प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांना फेस्टीव मूडचा लाभ मिळतो. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'बद्दलही असंच म्हणता येईल. दिवाळीआधीच्या बुकिंगने अनेक चित्रपटांना हात दिला आहे. रोहित शेट्टीचा 'गोलमाल अगेन'हा सुद्धा अशाच काही चित्रपटांपैकी एक. हा चित्रपट गेल्या वर्षी दिवाळीला प्रदर्शित झाला होता. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'च्या ॲडव्हान्स बुकिंगला सुरूवात झाली आणि बघता बघता तिकिटं संपून गेली. आमीर खान आणि अमिताभ बच्चन यांचा भव्य-दिव्य चित्रपट पाहण्याची उत्सुकता प्रेक्षकांना लागून राहिली आहे. 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान' बघत दिवाळी साजरी करण्याच्या योजना आखण्यात आल्या आहेत. अवघ्या काही दिवसात 'ठग्ज ऑफ हिंदुस्तान'ची दोन लाखांपेक्षा जास्त तिकिटं विकली गेली आहेत. त्यामुळे हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धमाका करणार हे नक्की!



## वाहिनीविश्वात

### सेटवरची दिवाळी

सगळीकडे दिवाळीचा माहोल आहे. पुढचा काही काळ तरी हाच सणासुदीचा उत्साही माहोल दिसणार आहे. मालिकांच्या सेटवरही दिवाळीचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे. सहकलाकारांसोबत दिवाळी साजरी करण्यावर सर्वांनी भर दिला आहे. प्रत्येकाचा सेटवर आनंद पसरवण्याचा प्रयत्न आहे. यंदाच्या दिवाळीत आनंद पसरवून एकमेकांमधले रूसवे फुगवे दूर करण्याचा चंग कलाकारांनी बांधला आहे. त्यामुळे दिवाळीनंतर टीव्ही क्षेत्रातलं वातावरण हलकंफुलकं होणार आहे.



## मायमराठी

### 'फ्लिकर'च्या निमित्ताने...

राज सरकार नव्या मराठी चित्रपटाची निर्मिती करत आहेत. 'फ्लिकर' असं या चित्रपटाचं नाव आहे. राजवीर सरकार यातून मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. 'फ्लिकर' प्रेक्षकांचं जबरदस्त मनोरंजन करेल अशी अपेक्षा आहे. अमोल पाडावे यांनी 'फ्लिकर'चं दिग्दर्शन केलं आहे तर दक्षिणेतले सुपरस्टार संगीतकार इल्लया राजा हे 'फ्लिकर'चे संगीतकार आहेत. तन्वी किशोर, सयाजी शिंदे, संजय मोने, शुभांगी लाटकर, पूजा पवार असे कलाकार या चित्रपटात आहेत.

